# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र.  94/2023                दिनांक : 01.03 .2023

## 1)खुनाचा प्रयत्न :-

**अर्धापुर :-** दिनांक 26.03.2023 रोजी 21.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर सार्वजनिक रोडवर बरकतपुरा अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस व त्याचे पुतण्यास यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे घरासमोर सार्वजनिक रोडवर जुन्या भांडण्याच्या कारणावरून तुमको बहोत मस्ती आई क्या आज तुमको छोडेंगे नही व तेरेको आज मार डालते असे म्हणुन हातातील तलवारीने डोक्यात मारून गंभीर दुखापत केली व दुसऱ्या आरोपीने खंजरने मानेवर मारून जखमी केले तसेच फिर्यादी हा भांडण सोडवण्यासाठी गेला असता आरोपीतांनी त्यास शिवीगाळ करून खंजरने पोटात मारून गंभीर दुखापत करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी फकरूला खान महेबुब खान, वय 50 वर्षे, व्यवसाय हॉटेल वेटर रा. बरकतपुरा अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरन 56/2023 कलम 307,324,504,506,34 भादवी सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सुरवासे, मो.क्रं. 9766110536** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :-

**1)मुदखेड :-** दिनांक 23.02.2023 रोजी 22.00 वा. ते दिनांक 23.02.2023 रोजी 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरा समोर धनगर गल्ली मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो कंपणीची काळया रंगाची मो. सा. क्रमांक एमएच-26/बीएफ-0634 किंमती 20,000/-रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी गजानन रामचंद्र कमळे, वय 30 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. धनगर गल्ली, मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरन 39/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री गीते,  मो. क्रं. 8329115398** हे करीत आहेत.

**2)उमरी :-** दिनांक 23.02.2023 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **स्टेट बॅक ऑफ इंडिया चे समोरून रोडवर उमरी ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा स्पेलंडर प्लस कंपणीची काळया रंगाची मो. सा. क्रमांक एमएच-26/एजी-8178 किंमती 20,000/-रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी मोहन पोचलु उलेवाड, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती रा. धानोरा ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 47/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2164 भालेराव,  मो. क्रं. 7798354377** हे करीत आहेत.

## 3)मोबाईल चोरी :-

**विमानतळ :-**दिनांक 14.02.2023 रोजी 18.30 वा. चे सुमारास, **आनंदनगर चौक जवळील वडापास चे गाडयावर,. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्याचा मित्र असे दोघेजन वडापाव चे गाडयावर स्टुलवर मोबाईल ठेवून वडापाव खात असताना फिर्यादीचा पोको कंपनीचा मोबाईल किंमती 12,000/-रूपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी त्रिमलेश गोविंद उगले, वय 18 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. नवरंगपुरा ता. कंधार जि. नांदेड ह.मु. नाईकनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 70/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/591 नागरगोजे,  मो.क्र. 8412879395** हे करीत आहेत.

## 4)अवैध रेती चोरी :-

**उमरी :-**दिनांक 27.02.2023 रोजी 21.45 वा. चे सुमारास, **गोरठा उमरी रोडवरील मामा चौकाच्या जवळ ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद आठ आरोपीतांनी संगणमत करुन बिना परवाना बेकायदेशिरीत्या टिप्पर क्रं एमएच-26/एडी-0827 मध्ये 2 ब्रास रेती किंमती 10,000/- रूपयाची व टिप्पर किंमती 10,00,00/- रूपयाचे सह मिळुन आल्याने त्यास तहसील कडे घेण्यास सांगितले असता चालकांनी व त्याचे सहकारी यातील नमुद आरोपीतांनी फिर्यादी सोबत हुज्जत घालून झटापट केली व टाळाटाळ केली पोलीसांना बोलावून त्यांच्या समक्ष रेतिसह टिप्परचा जप्ती पंचनामा करून तहसील कार्यालयात लावलेला टिप्पर रेतीसह पळवुन नेला व सरकारी कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी मयुर सुर्यकांत शेळके, वय 38 वर्षे, व्यवसाय नौकरी मंडळअधिकारी तहसील कार्यालय उमरी ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 46/2023 कलम 353,379,114,34 भादवी सह कलम 48 म.ज.अ. 15 पर्यावरण संरक्षण कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री करे, मो. क्रं. 7798354377** हे करीत आहेत.

## 5)फसवणुक :–

**1)किनवट :–** दिनांक 14.02.2023 रोजी 10.00 वा. ते दिनांक 28.02.2023 रोजी 10.00 वा. चे दरम्यान, **कुबेर लॉज रेल्वेस्टेशन जवळ किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून राज्य शासनाचे पोकरा व एकात्मिक फलोत्पादन अभियान या शासकीय योजने अंतर्गत पॉली हाऊस व शेड नेट बसवून देण्याचे फिर्यादी व नऊ साक्षीदार शेतकऱ्यांना विश्वासात घेवून आरटीजीएस व्दारे आयडीबीआय बॅक शाखा चिपळुन जि. रत्नागिरी या खात्यावर 32,90,000/–रूपयाची रक्कम खात्यात जमा करून घेवून फसवणुक करून विश्वासघात केला. वगैरे **फिर्यादी राजेश हनमनलु बोलनवार, वय 53 वर्षे, व्यवसाय शेती रा. किनवट ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 55/2023 कलम 420,406,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सावंत, मो.नं. 9856935555** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :–** दिनांक 04.08.2022 रोजी 12.00 वा. चे दरम्यान, **निबंधक कार्यालय, नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी निबंधक कार्यालयातील शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संगणमत करून चुकीच्या पदधतीने व फिर्यादीस न विचारता प्लॉट चे बनावट कागदपत्रे, मुखत्यारनामा व विक्रीखत करून फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी साहेबराव तुळशिराम देबडे, वय 61 वर्षे, व्यवसाय शेती रा. हनुमानगड, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन मा. न्यायालयाचे आदेशाने कलम 156 (3) सीआरपीसी प्रमाणे **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 63/2023 कलम 420,467,468,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री माने, मो.नं. 9403546846** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**भाग्यनगर :–** दिनांक 20.05.2016 रोजी 10.00 वा. ते दिनांक 23.02.2023 रोजी 17.00 वा. पावेतो, **मौजे भालकी ह.मु. अष्टविनायक नगर, नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु दिसायला चांगली नाहीस तुला स्वयंपाक येत नाही असे म्हणुन मारहाण व शिवीगाळ करून शारिरीक व माणसीक छळ केला व दुसरे लग्न करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 54 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 82/2023 कलम 498(अ),494,323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1303 हुंडे, मो.क्रं. 7798006100** हे करीत आहेत.

## 7)अपघात :–

**अर्धापुर :–** दिनांक 28.02.2023 रोजी 00.30 वा. चे सुमारास, **बाबा पेट्रोल पंपाचे समोर भोकरफाटा ते नांदेड जाणोर रोडवर खडकुत पाटीच्या आलीकडे दाभड शिवार ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने त्याचे ताब्यातील कार क्रं एमएच–37/जी–9889 हि भरधाव वेगात हयगय व निष्काळजीपणे चालवून कार डिव्हायडरचे पलीकडे भोकर फाटा ते नांदेड जाणारे रस्त्यावर येवून टेम्पो क्रं एमएच–13/सीयु–4644 ला चालकाकडील दरवाजावर जोराची धडक दिली त्यामुळे टेम्पोची समोरची काच फुटून टेम्पो चालक **मयत नामे राम प्रल्हाद डोंगरे वय 50 वर्षे व्यवसाय चालक रा. इंचगाव ता. मोहोळ जि. सोलापुर** हे बाहेर पडुन गंभीर जखमी होवून मरण पावला तसेच टेम्पोच्या डावीकडून कार क्रं एमएच–23/एडी–3567 ही आली व तीस टेम्पोची धडक लागल्याने कार रस्त्याचे डावे बाजूस असणारे मातीच्या भागावरून खाली उतरली त्यामुळे कार मधील चार ईसम जखमी झाले. तसेच आय 20 कंपनीची कार क्रं. एमएच–37/जी–9889 मधील **मयत नामे 1) अमित विठ्ठलराव घुगे वय 29 वर्षे रा. गीतानगर, नांदेड (2) साईनाथ रावसाहेब मुळे वय 36 वर्षे रा. नाईकनगर, नांदेड** गंभीर जखमी होवून मरण पावले यातील मयत तिन्ही लोकांचे मरणास यातील कार क्रं एमएच–37/जी–9889 चा चालक कारणीभूत झाला. वगैरे **फिर्यादी दत्तात्रय ज्ञानेश्वर जाधव, वय 32 वर्षे, व्यवसाय चालक रा. बेगमपूर ता. मोहोळ जि. सोलापूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं. 57/2023 कलम 279,337,338, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कपिल मुरलीधर आगलावे, मो.क्र. 9767777884** हे करीत आहेत.

## 8)अवैध गुटखा बाळगला :–

**हिमायतनगर :–** दिनांक 26.02.2023 रोजी 22.30 वा. चे सुमारास, **बागवान गल्ली आरोपीचे घरी प्रॉपर हिमायतनगर, ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या मानवी शरीरास अपायकारक असलेल्या राज्य शासनाने बंदी घातलेल्या पदार्थाची विवीध कंपणीचा गुटखा किंमती 19,92,852/–रुपयाचा मालासह चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने ताब्यात बाळगलेले मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सतीश सुभाषराव हाके, वय 33 वर्षे व्यवसाय नौकरी अन्नसुरक्षा अधिकारी सहा. आयुक्त कार्यालय अन्न व औषध प्रशासन नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 46/2023 कलम 188,272,273,328 भादवी सह कलम 59,30, (2)(1), 26(2)(1),27(3)(6) अन्न सुरक्षा मानदे कायदा 2006 प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री महाजन, मो.क्रं. 9689707038** हे करीत आहेत.

## 9)शासकीय आदेशाचे उल्लंघन :-

**हिमायतनगर** :-दिनांक 27.02.2023 रोजी 19.55 वा. चे सुमारास, **हनुमान मंदिराजवळ रोडवर डोलारी गावात ता. हिमायनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या शिवजयंती मिरवणुक काढण्याची परवानगी न घेता तसेच वादय वाजवण्याची परवानगी न घेता मिरवणुक काढुन मा. जिल्हाधिकारी साहेब नांदेड यांचे जमावबंदी व शासकीय आदेशाचे उल्लंघन केले आहे. वगैरे **फिर्यादी पोना/पवन मारूतीराव चौधरी, वय 43 वर्षे ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 45/2023 कलम 188 भादवी सह कलम 135 मु. पो. का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री के.बी. कांगणे, मो.क्रं. 9834774799** हे करीत आहेत.

## 10)भारतीय हत्यार कायदा :-

**नांदेड ग्रामीण** :-दिनांक 28.02.2023 रोजी 19.30 वा. चे सुमारास, **एन.डी. 42 सिडको, नांदेड येथे,** यातील नमुद फिर्यादी हे त्याच्या आत्याचा मुलचा खुन झाल्याने त्या संदर्भात ईतर नातेवाईकांसह त्याच्या आत्याचा मुलाचा खुन झाल्याने त्या संदर्भात ईतर नातेवाईकांसह त्याच्या आत्याच्या घरी बोलत बसले असता यातील आरोपी हे त्यांचे हातामध्ये खंजर व तलवार घेवून गल्लीमध्ये आले असता ते फिर्यादी व त्याचे नातेवाईकांकडे बघत जात असतांना तुम्ही ईकडे कसकाय आले म्हणुन पकडण्यासाठी त्यांचा पाठलाग केला असता यातील नमुद आरोपी पैकी एक आरोपी त्याचे हातातील खंजरसह मिळुन आल्याने त्याला पकडुन पोलीसांचे ताब्यात दिले. वगैरे **फिर्यादी दिलीप मधुकर उबाळे, वय 43 वर्षे व्यवसाय केंद्रीय समर्कता आयोग व राष्ट्रीय मानव अधिकार आयोग सदस्य रा. एन.डी. 42 डी 3 सिडको नांदेड** यांनी दिलेल्या फिर्याद वरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 123/2023 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा सह कलम 135 म.पो.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री एस. शिंदे, मो.क्रं. 9511851737** हे करीत आहेत.

## 11)जुगार :-

**1)भाग्यनगर** :- दिनांक 28.02.2023 रोजी 15.20 वा. चे सुमारास, **जंगमवाडी देशी दारूच्या अडयासमोर सार्वजनिक रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशीररीत्या टाईम बाजार क्लोज नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1560/-रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/818 प्रदीप संभाजी गर्दनमारे, ने. पोस्टे भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 83/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2294 हुंडे, मो.क्रं. 7083182294** हे करीत आहेत.

**2)रामतीर्थ** :- दिनांक 27.02.2023 रोजी 21.30 वा. चे सुमारास, **बेळकोणी खुर्द ग्रामपंचायत इमारती जवळ ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशीररीत्या तितली भवरा नावाचा गुडगुडी जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2700/-रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/180 संजय माधवराव शिंदे, ने. पोस्टे रामतीर्थ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतीर्थ** गुरनं 30/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2476 पठाण, मो.क्रं. 9823027725** हे करीत आहेत.

## 12)विद्युत शॉक लागुन मृत्यु :-

**उस्माननगर** :-दिनांक 21.02.2023 रोजी 11.29 वा. चे सुमारास, **सरकारी दवाखाना विष्णुपूरी, नांदेड येथे,** यातील खबर देणार यांचा भाऊ **मयत नामे विठ्ठल संभाजी मोरे, वय 48 वर्षे, व्यवसाय शेती रा. उमरा ता. लोहा जि. नांदेड,** हा शेतातील विद्युत विहीरीवरील विद्युत मोटार लावीत असताना त्यास शॉक लागल्याने उपचारकामी स. द. विष्णुपूरी नांदेड येथे दाखल केले असता उपचारा दरम्यान मरण पावला. वगैरे **खबर गजानन संभाजी मोरे, वय 36 वर्षे, व्यवसाय शेती रा. उमरा ता. लोहा जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे उस्माननगर** आ. मृ. **10/2023** कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2499 भारती, मो.नं. 8378989949** हे करीत आहेत.

## 13)विषारी औषध पिऊन आत्महत्या :-

**उस्माननगर** :-दिनांक 12.02.2023 रोजी 10.00 वा. चे सुमारास, **सरकारी दवाखाना विष्णुपुरी नांदेड येथे,** यातील **मयत नामे बाबाराव मारोती वडवळे, वय 52 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. कापसी बु. ता. लोहा जि. नांदेड,** यांनी सततचे नापीकीला व बँकेचे कर्ज कसे फेडावे व मुलीचे लग्न कसे करावे या काळजीत राहुन कोणतेतरी विषारी औषध पिऊन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार मारोती बाबाराव वडवळे, वय 20 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. कापसी बु. ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे उस्माननगर** आ. मृ. **09/2023** कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री केंद्रे, मो.नं. 9823996314** हे करीत आहेत.


जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड